# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.11.2024** **वारःगुरुवार**

---

-विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा राज्यभरात धडाका, स्थानिक नेत्यांचा गृहभेटी, प्रचार फेऱ्यांवर भर तर ज्येष्ठ नेत्यांच्या परस्परांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी

- मतदार जनजागृतीसाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम

- दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी-ट्वेंटी मालिकेत भारत 2-1 आघाडीवर

- दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात आज आणि उद्या जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा

**<u>प्रचार</u>**

राज्यातल्या विधानसभा निवडणूकीच्या प्रचाराचे आता शेवटचे काही दिवस आता राहिले असून सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. स्थानिक नेते पदयात्रा, प्रचार फेऱ्या, गृहभेटी यांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. तर उमेदवारांच्या प्रचारासाठी आलेल्या वरिष्ठ नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत.

**<u>महायुती</u>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या काल राज्यात ठिकठिकाणी जाहीर सभा झाल्या. महाराष्ट्रातली संस्कृती, संस्कार जपण्यासाठी युतीचं सरकार बनलं आहे. महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करा, असं आवाहन शहा यांनी जळगाव जिल्ह्यातल्या चाळीसगावमध्ये झालेल्या जाहीर सभेत केलं. कोरोना काळात घरात बसून राहणारे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री तुम्हाला काय मदत करणार, अशी टीका शहा यांनी केली.

शहा यांनी धुळे जिल्ह्यातल्या दोंडाईचा आणि परभणी जिल्ह्यातल्या जिंतूर इथंही सभा घेतली. मराठवाड्यातील दुष्काळाचा प्रश्न मिटवून प्रत्येक शेतात पाणी पोहचण्यासाठी वॉटर ग्रीड प्रकल्प उभारणार असल्याचं शहा यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पालघरमध्ये जनसभा घेतली. पालघरमध्ये आम्ही एक्स्प्रेस सिलिंक आणत आहोत. त्यामुळें पालघर आता ग्रामीण पालघर राहणार नाही तर ते महाराष्ट्राचं ग्रोथ इंजिन होईल, असं शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अकोल्यात मूर्तिजापूर इथं जाहीर सभा घेतली.

देशाची तिसऱ्या जागतिक महासत्तेकडे वाटचाल सुरू असून त्यात सहभागी व्हा,असं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी नांदेडमध्ये केलं.

**<u>मविआ</u>**

राज्यातलं महायुतीचं सरकार जनतेला खोटी आश्वासनं देऊन फसवणूक करत असल्याची टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी लातूर इथल्या प्रचारसभेत केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहता आणि वांबोरी इथं प्रचार सभा घेतल्या. लोकशाहीतही काही शक्ती दडपशाहीचा वापर करुन लोकभावनांशी खेळत असतील तर त्यांना मतपेटीच्या माध्यमातून धडा शिकवा, असं शरद पवार यावेळी म्हणाले.

सांगली जिल्ह्यातल्या शिराळा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉक्टर अमोल कोल्हे यांची प्रचार सभा झाली.

खासदार संजय राऊत यांनी काल धुळ्यात झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपावर निशाणा साधला. जो प्रकल्प महाराष्ट्रात येतो आहे असं वाटतं, मात्र तो अन्य ठिकाणी हलवला जातो. हे सगळं थांबवायचं असेल तर महाविकास आघाडीचं सरकार महाराष्ट्रात स्थापन करावं लागेल, असं राऊत म्हणाले.

विधानसभेची ही लढाई महाराष्ट्र प्रेमी विरुद्ध महाराष्ट्र द्रोही अशी आहे. असं मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सिंधुदुर्गातल्या सभेत बोलताना व्यक्त केलं. त्यांनी काल सावंतवाडी, कणकवली आणि मालवण इथं प्रचार सभा घेतल्या.

**<u>संवेदनशीलकेंद्र</u>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुवा विधानसभा मतदार संघात अतिदुर्गम भागात मतदान केंद्रांची मतदानाची वेळ सकाळी सात ते दुपारी तीन अशी निश्चित केली असल्याचं जिल्हा निवडणूक अधिकारी डॉक्टर मिताली सेठी यांनी सांगितलं. सातपुडा पर्वत रांगेत असलेल्या या मतदान केंद्रांवर पोहचण्यासाठी प्रथम रस्ते मार्ग आणि नंतर बोटीतून प्रवास करावा लागतो.

**<u>प्रचारजाहिरात</u>**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीचा दिवस आणि आदल्या दिवशी वर्तमानपत्रासारख्या मुद्रित माध्यमात प्रकाशित होणाऱ्या प्रचार जाहिरातींचं प्रमाणीकरण आवश्यक आहे. या दोन दिवसांत, प्रचार बंद झाल्यानंतर, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळं कोणतीही अप्रिय घटना घडू नये, यासाठी दक्षता म्हणून आयोगानं प्रचार जाहिरातींचं प्रमाणीकरण करून घेऊनच त्या प्रसिद्धीस देण्याचे निर्देश जारी केले आहेत.

हे प्रादेशिक बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात...

**<u>जनजागृती</u>**

मतदानाचा टक्का वाढवा यासाठी राज्यात सर्वत्र मतदार जनजागृतीचे कार्यक्रम होत आहेत.

हिंगोलीचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हिंगोली जिल्ह्यात पोलीस यंत्रणेकडून केलेली तयारीची माहिती देत मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

सोलापूर जिल्ह्यात अकलूज नगर परिषद आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे भारताचा नकाशा तयार करून शंभर टक्के मतदान करण्याबाबत संदेश दिला.

सातारा जिल्ह्यात रहिमतपूर नगरपरिषदेमार्फत शाळा आणि महाविद्यालयांच्या सहयोगानं विद्यार्थी फेरी काढण्यात आली.

कराड उत्तर विधानसभा मतदार संघातल्या विविध शाळांमध्ये मानवी साखळी तयार करून मतदानाची शपथ देण्यात आली.

पुण्यातल्या शिवाजीनगर मतदार संघात पी.ई.एस. गर्ल्स हायस्कूलमधल्या विद्यार्थिनींनी पालकांना पत्र लिहून मतदान करण्याचं आवाहन केलं.

**कथक-रोहिणीभाटे**

कथक या नृत्यकलेत पुणे शहराला जगाच्या नकाशावर आणणाऱ्या पंडिता गुरु रोहिणी भाटे यांची जन्मशताब्दी काल साजरी करण्यात आली. रोहिणी भाटे यांनी स्थापन केलेली नृत्यभारती ही संस्था कथक नृत्यकलेच्या प्रसारासाठी सातत्यानं कार्य करत आहे. नृत्य भारतीच्या संचालिका नीलिमा आद्ये यांनी आकाशवाणीशी बोलताना आपल्या गुरुविषयी भावना व्यक्त केल्या...

**पुस्तकमहोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सव यावर्षी 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक आणि संयोजक राजेश पांडे, यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. या महोत्सवासाठी 700 दालनांची नोंदणी देखील झाली आहे. वाचन संस्काराला बळ मिळेल असे विविध कार्यक्रम होणार असून देशभरातील विविध भाषांमधील साहित्यिकांची उपस्थिती हे या महोत्सवाचं आकर्षण आहे असं मलिक यावेळी म्हणाले.

महोत्सवाची माहिती देताना मिलिंद मराठे म्हणाले...

**<u>एनसीआरए</u>**

स्क्वेअर किलोमीटर ॲरे ऑब्जर्वेटरी कौन्सिल यामध्ये भारताला नुकतंच सदस्यत्व मिळालं असून हे सदस्यत्व पुण्यातल्या नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स इथं एका विशेष कार्यक्रमाद्वारे साजरं करण्यात आलं. एसकेएओ कौन्सिल ही संस्था जगातल्या विविध राष्ट्रांना एकत्र आणून अत्याधुनिक रेडिओ टेलिस्कोपद्वारे मिळालेल्या माहितीची देवाण-घेवाण करते. अणुऊर्जा विभागाचे सचिव, विज्ञान तंत्रज्ञान विभागाचे सचिव यांच्यासह वरिष्ठ सरकारी अधिकारी, शैक्षणिक संस्थांचे सदस्य, उद्योजक आदी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका दरम्यान तिसरा टी ट्वेन्टी सामना भारतानं 11 धावांनी जिंकला. या विजयामुळं चार सामन्यांच्या मालिकेत भारतानं 2-1 अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतानं तिलक वर्माचं नाबाद शतक आणि अभिषेक शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेला जिंकण्यासाठी 220 धावांचं उद्दिष्ट दिलं. दक्षिण आफ्रिकेचा डाव 208 धावांवर संपुष्टात आला. मार्को यानसेन याच्या तडाखेबंद 17 चेंडूतील 54 धावांमुळं भारतीय गोटात चिंतेचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र तो बाद झाल्यावर भारताचा विजय सुकर झाला. मालिकेतील चौथा आणि अंतिम सामना उद्याच खेळला जाणार आहे.

**<u>हवामान</u>**

दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात आज आणि उद्या तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**